REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 10 | ISSUE - 9 | JUNE - 2021

# महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह

अश्विनी मनोहर जाधव
एम्.फिल.,इतिहास विभाग, मुंबई विद्यापीठ कलिना,सांताक्रूझ मुंबई.

## प्रस्तावना-




सामाजिक न्यायाचे प्रेषित डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी सामाजिक सुधारणा चळवळ सुरू केली . १९२० ते १९३० च्या काळात भारतामध्ये अभूतपूर्व क्रांतिकारक , राजकीय , सामाजिक , धार्मिक आणि कामगार वर्ग चळवळी उदयास आल्या होत्या. डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय कारकिर्दीसाठी १९२० ते महत्त्वपूर्ण मानले जाते . डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या कार्यास १९२४पासून सुरुवात केली होती. २० मार्च १९२७ रोजी विषमतेच्या बंधनाला तोडून डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी रायगड जिल्ह्यातील महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह घडवून आणला.

प्राचीन काळापासून भारतामध्ये जातीयता , अस्पृश्यता , चातुर्वर्ण्य व्यवस्था या अस्तित्वात असल्यामुळे या व्यवस्थेमुळे अस्पृश्यांना गुलामगिरीचे जीवन जगावे लागत होते . जातीयता अस्तित्वात असल्यामुळे अस्पृश्यतेची स्वतः बाबासाहेबांना देखील लहानपणापासून झळ सोसावी लागली होती . त्याकाळी हिंदूंची स्थिती गंभीर होती त्यांचे समाजातील स्थान दुय्यम होते . ज्या धर्माच्या नावावर बहुजन समाज विभागला गेला हजारों वर्षे गुलामीत खितपत पडला . त्यांना त्यातून बाहेर काढून सन्मानपूर्व जीवन जगण्यासाठी बाबासाहेबांनी अनेक चळवळी घडवून आणल्या . या अनेक चळवळी पैकीच " महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह ऐतिहासिक चळवळ " होती. आंबेडकर चळवळीच्या पहिल्या महत्वाच्या घटनेवर , तसेच महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह कसा झाला ? याचा उल्लेख या लेखात लिहिण्याचा प्रयत्न केला गेला आहे . बहुसंख्य समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांनी केले . पाणी ही निसर्गाची देणगी आहे . या पाण्यावर सर्व जीवजंतूचा अधिकार आहे . परंतु जीवजंतूचा अधिकार असल्यामुळे मानव जाती म्हणून आपला सुद्धा त्या पाण्यावर अधिकार आहे . हे सिद्ध करण्यासाठी बाबासाहेबांनी महाड 14 तळ्याचा सत्याग्रह घडवून आणला .

## बहिष्कृत हितकारणी सभा-

डॉ . बाबासाहेब आंबेडकर उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला गेले असताना त्यांच्या लक्षात आले की अस्पृश्यता , जातीयता ही फक्त भारतामध्येच अस्तित्वात आहे . डॉ . बाबासाहेब आंबेडकर 1923 मध्ये उच्च शिक्षण घेऊन भारतात परत आल्यानंतर ते उच्च न्यायालयात वकिली करत असताना त्यांच्या लक्षात आले की , अस्पृश्यांवर विविध प्रकारे

अन्याय- अत्याचार होत आहेत . त्यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे याकरिता त्यांनी अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी सामाजिक सुधारणा चळवळ सुरू केली . समाजातील अस्पृश्य वर्गाची दुर्दशा लक्षात घेऊन त्यांनी अस्पृश्य लोकांना दिली जाणारी वागणूक बरोबर नाही . याकरिता आपल्याला काहीतरी करावे लागेल... तसेच अस्पृश्य लोकांना अन्याय- अत्याचारातून वर काढण्यासाठी काहीतरी वेगळा मार्ग काढण्यासाठी काहीतरी वेगळा मार्ग काढावा लागेल याकरिता बाबासाहेबांनी अस्पृश्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी तसेच लोकांच्या तक्रारी अडचणी सरकार समोर ठेवण्यासाठी डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांनी ९ मार्च १९२४ रोजी मुंबईच्या दामोदर हॉल येथे एक सभा आयोजित केली . या सभेद्वारे अस्पृश्यांचे प्रश्न सोडवून त्यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न बाबासाहेबांचा होता . " २० मार्च १९२४ रोजी बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना करण्यात आली . " या संघटनेचे ब्रीदवाक्य , " शिका , संघटित व्हा , संघर्ष करा ." असे होते . बहिष्कृत हितकारणी सभेचे काही उद्दिष्ट होते ते खालील प्रमाणे आहेत.

१ - शिक्षणाचा प्रसार वास्तुशांत सामाजिक व आर्थिक स्त्रीवर उद्धार करणे .

२ - अस्पृश्यांमध्ये संस्कृतीचा प्रसार वाचनालये सामाजिक केंद्रे व शिक्षा वर्गही मार्ग खुले करून प्रोत्साहन देणे .

३ - शिक्षणाच्या प्रसाराला चालना देण्यासाठी वसतिगृह सुरू करणे व इतर आणि गरजेचा मार्गांचा अवलंब करणे .

४ - अस्पृश्यांच्या सामाजिक व आर्थिक उद्योग करण्यासाठी कार्यरत मदत व संघटित करणे .

### बोले यांचा विधिमंडळातील ठराव

सीताराम केशव बोले यांनी विधिमंडळात एक ठराव मंजूर करून घेतला होता . त्या ठरावानुसार अस्पृश्यांसाठी सार्वजनिक शाळा , पाणवठे , मंदिरे , सभागृहे न्यायालये , धर्मशाळा अस्पृश्यांसाठी खुला करावी असा ठराव होता . महाड नगरपालिकेने आपल्या अधिकाराखाली असलेले महाड चवदार तळे अस्पृश्यांसाठी खुले केले होते . परंतु स्पृश्यवर्गीय लोकांच्या भीतीमुळे अस्पृश्यांना या तळ्यावर जाऊन पाणी पिण्याचा प्रत्यक्ष हक्क बजावला नव्हता . त्यामुळे ठरावाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी तसेच कायद्याने मिळवलेला अधिकार प्रत्यक्ष अंमलात आणण्यासाठी बाबासाहेबा त्यांच्या कार्यकर्त्यांनी हा ठराव प्रत्यक्ष अंमलात आणण्याचा विचार केला. ठराव प्रत्यक्ष उतरवण्यासाठी सहस्त्रबुद्धे , चित्रे , दादासाहेब दोंदे, देवराम नाईक यांचा समावेश होता . तर अस्पृश्य वर्गातील शिवतरकर , मोरे , बाळाराम आंबेडकर , राजभोग , गायकवाड यांनी आंदोलनाचे नेतृत्व केले .

### महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह-

१९ व २० मार्च १९२७ रोजी महाड येथे सत्याग्रह करण्याकरिता पहिली परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेसाठी डॉ . बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी मुंबईत निरनिराळ्या भागात सभा , परिषदा , आयोजित केल्या होत्या . १९ तारखेला या परिषदेस सुरुवात झाली होती या परिषदेसाठी त्यात काही बायकां , मुले व म्हातारी माणसे देखील आली होती . या परिषदेत ३००० लोक मंडळी उपस्थित होती . परिषदेस सुरुवात झाल्यानंतर त्यात काही मान्यवरांनी भाषणे झाली तसेच हक्काची व कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी काही ठराव मांडण्यात आले . भाषणे झाल्यानंतर या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी बाबासाहेब व त्यांचे सहकारी मंडळी चवदार तळ्याचे पाणी प्राशन करण्याकरिता चवदार तळ्यावर गेले . बाबासाहेबासह सर्व सहकारी व्यासपीठावरून खाली उतरले आणि चार- चारच्या रांगा करून चवदार तळावर गेले . बाबासाहेबांनी चवदार तळ्याचे एक ओंजळ पाणी प्राशन केले व अस्पृश्याचे जीवन उजळून काढले . " भारताच्या इतिहासातील मानवतेचा व समतेचा संदेश देणारा २० मार्च १९२७ हा दिवस होता " .बाबासाहेबांनी महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह घडवून आणला . व अस्पृश्य लोकांना मानवी हक्क व नागरिक हक्क मिळवून दिला .

### सत्याग्रही मंडळी व सनातन्यांचे अत्याचार-

सत्याग्रहासाठी आलेली मंडळी सत्याग्रह संपल्यानंतर आप-आपल्या गावी जाण्यासाठी निघाली असताना तसेच काही मंडळी बाजार करत असताना गावातील स्पूश्यवर्गीय मंडळीनी अस्पृश्यांनी आपले पिण्याचे पाणी बाटवले अशी खोटी दवंडी गावात पसरवण्यात आली . खोटी दवंडी ऐकून गावांतील स्पूश्य लोकांची माथी भडकली. त्यामुळे गावातील स्पर्शवर्गीय लोकांकडून अस्पृश्यवर्गीय लोकांना बेदाम मारण्यात आले . त्याचबरोबर त्यांच्या परिषदेच्या मंडपात असलेल्या अन्ना मध्ये माती कालवण्यात आली . त्यानीं विकत घेतलेले पिण्याचे पाणी लोटून देण्यात आले . परिषदे साठी आलेल्या लहान मुले , बायकां यांना देखील मारण्यात आले . महाड सत्याग्रहाचा शेवट हा रक्तपाता मध्ये झाला . अस्पृश्यांवर मोठ्या प्रमाणावर अन्याय अत्याचार झाला. त्याचबरोबर अस्पृश्यानी चवदार तळ्याच्या पाण्याला स्पर्श केला म्हणून गावातील स्पूश्य ब्राह्मण लोकांकडून चवदार तळ्याचे शुध्दीकरण करण्यात आले . हे शुध्दीकरण त्यानीं प्राण्यांच्या शेण, मल-मूत्र , दही , दू ध यांनी केले . माणसासारखे माणूस असून सुद्धा अस्पृश्याना जी अमानुष वागणूक दिली जाते या गोष्टींची बाबासाहेबांना मनस्वी चीड आली .

### महाड सत्याग्रह परिषद

अस्पृश्य लोकांना माणसां सारखी माणसे असून सिद्धा तुच्छ वागवले जात होते . त्यानां स्वातंत्र्याचा , शिक्षणाचा तसेच राजकीय , आर्थिक हक्क नाकारण्यात आलेले होते . त्यांना समाजामध्ये मानाचे स्थान मिळावे तसेच त्यांना त्याच्या दारिद्र अवस्थेतून मुक्त करण्यासाठी बाबासांहेबानी २५ , २६ , २७ डिसेंबर १९२७ रोजी पुन्हा महाड येथे सत्याग्रह करण्याचे निश्चित केले . ४ ऑगस्ट १९२७ रोजी महानगरपालिकेने या ठरावानुसार महाड तळे सर्वांसाठी खुले केले होते . तो ठराव मागे घेण्यात आला . त्यामुळे अस्पृश्यांना चवदार तळ्यावर पाणी भरण्यास मज्जाव करण्यात आला होता . म्हणून डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या सहकाऱ्यांनी अस्पृश्यांचे आव्हान स्विकारुन महाड येथे सत्याग्रह करण्याची पुन्हा योजना आखली . त्यासाठी त्यांनी पुन्हा परिषदा , सभा आयोजित केल्या . त्यानीं विविध वृत्तपत्राद्वारे आपले विचार खेडोपाडी , गावात पसरवले . या परिषदेसाठी जास्तीत जास्त मंडळी येण्याची आवश्यकता असल्यामुळे जागेची खाण्याची , पिण्याची तसेच जागेची तयारी अनंतराव चित्रे यांनी केली . डॉ . बाबासाहेब आंबेडकर आपल्या सहकाऱ्यांसोबत २४ डिसेंबर रोजी महाडला जाण्यासाठी निघाले . अस्पृश्य लोक आता पुन्हा येऊन तळ्यातील पाणी बाटवणार याकरिता गावातील अस्पृश्यवर्गीय लोकांकडून १२ / १२ / १९२७ ला तात्पुरता कोर्टाचा मनाई हुकुम काढला .कोर्टाचा मनाई हु कूम असल्यामुळे अस्पृश्याना चवदार तळ्यावर पाणी भरता येणार नाही . याकरिता सत्याग्रह स्थागित करावा लागला त्यामुळे वपरिषदेच्या कामकाजात फेरबदल करण्यात आला .त्याचप्रमाणे ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणे नुसार 25 डिसेंबर १९२७ रोजी रात्री ९ वाजता मनुस्मृ ती दहनाचा कार्यक्रम करण्यात आला .

### मनुस्मृ ती दहन -

महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह बरोबरच डॉ . बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृ ती या ग्रंथावर बंदी आणण्याचा प्रयत्न केला . मनुस्मृ ति ग्रंथामुळे अस्पृश्यांवर तसेच शूद्रा- अतिशूद्र यांच्यावर अनेक प्रकारचे अन्याय अत्याचार होत होते . अस्पृश्यांचे जीवन मनूस्मृ तीतील ब्राह्मणी काळ्या कायद्याने उद्‌ध्वस्त करून टाकले होते . मनुस्मृ ती ही 200 वर्षांपूर्वी लिहिली गेली होती . वेद , स्मृती , आरोग्य , ब्राह्मणे , श्रुती , पुराने यांचा हिंदू जनसामान्यांवर पगडा होता . मनुस्मृती या ग्रंथात ब्राह्मण क्षत्रिय , वैश्य आणि शूद्र या जातीने कसे राहावे हे नमूद केलेले आहे . मनुस्मृ ती या ग्रंथात काही अध्याय दिलेल्या आहेत त्या अध्यायामध्ये स्त्रियांशी व शूद्र जातीतील लोकांशी कसे राहावे व कसे वागावे हे नमूद केलेले आहे . डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांनी अनिष्ट रूढी परंपरेचा नायनाट करण्यासाठी २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे आपल्या

सहकाऱ्यांचा तसेच साधूंच्या उपस्थितीमध्ये मनुस्मृती ग्रंथाची पाने फाडून यज्ञविधी मध्ये जाळून टाकली . मनुस्मृतीचे दहन करून डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदूच्या सामाजिक पुनर्रचनेसाठी समता व स्वातंत्र्य बांधून स्त् तत्त्वाचा नव्या स्मृतीची मागणी केली . मनुस्मृति या ग्रंथात शूद्र जातीची निंदा करणारे तसेच अस्पृश्याविषयीं अनादर वाढवणारी वचने या ओतप्रोत भरलेली होती . याकरिता बाबासाहेबांनी महाड येथे " मनुस्मृती ग्रंथाची " होळी केली .

**बाबासाहेब व स्त्रिया -**

महाड परिषदेच्या वेळेस स्त्रियांसाठी बाबासाहेबांनी एक व्याख्यान आयोजित केले होते . त्यात बाबासाहेबांना स्त्रियांना सक्षम करायचे होते याकरिता त्यांनी आपले विचार स्त्रियांसमोर मांडले . आपले विचार स्त्रियांसमोर मांडत असताना त्यांनी स्त्रियांना सांगितले की आपण जी लुगडे नेसतात ती लुगडी नेसण्याची पद्धत बदलली पाहिजे . तुमच्या अशा लुगडे नेसण्याची पद्धत तुम्हाला अस्पृश्य असल्याची साक्ष देतात ती साक्ष तुम्ही नष्ट केली पाहिजे . त्याकरिता तुम्ही स्पृश्य स्त्रिया ज्याप्रमाणे लुगडी नसतात त्याप्रमाणे तुम्ही लुगडे नेसली पाहिजे . स्त्रियां बरोबरच बाबासाहेबांनी पुरुषांना देखील अंगठ्या , काट्या तसेच मेलेल्या जनावराचे मांस खाणे सोडून देण्यास सांगितले . महाड सत्याग्रहा बरोबरच समाजामध्ये जनजागृती निर्माण करण्याचे काम सुरू केले होते .

**महाड सत्याग्रहातील कोर्टाचा निकाल-**

डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांनी सार्वजनिक ठिकाणी पाणी पिण्याचा अधिकार अस्पृश्यांना देखील आहे हे सिद्ध केल्यामुळे गावातील सवर्णीय वर्गाकडून बाबासाहेब व त्यांच्या सहकार्यावर उच्च न्यायालयात फिर्याद दाखल करण्यात आली. कोर्टाचा दिवाणी निकाल लागेपर्यंत सत्याग्रह तहकुब करण्यात आला होता . स्पर्श व अस्पृश्य समाज एकमेकांविरुद्ध उभा होता. बाबासाहेबांनी अस्पृश्या विरुद्ध कोर्टा मध्ये खटला चालवला होता . महाड चवदार तळ्याचा सत्याग्रहाचा उच्च न्यायालयात दहा वर्षे खटला चालू होता . कोर्टाने सर्व खटल्याची खरी माहिती तसेच तेथील परिस्थिती व तळ्याचे ऐतिहासिक महत्त्व आणि जुन्या रितीरिवाज यांचा संक्षिप्त आढावा घेऊन १७ मार्च १९३७ रोजी न्यायमूर्ती ब्रूमफिल्ड यांनी खटल्याचा निकाल जाहीर केला .

महाड खटल्याचा हा निकाल दहा वर्षांनी अस्पृश्यांच्या बाजुने लागला दहा वर्षानंतर कायदेशीर रित्या अस्पृश्यांसाठी महाड चवदार तळ्याचे पाणी पिण्यासाठी खुले करण्यात आले . १७ मार्च १९३७ मध्ये पूर्ण झाली आणि अस्पृश्याना आपला हक्क मिळाला .

**उपसंहार -**

अस्पृश्य वर्गाच्या उद्धारासाठी बाबासाहेबांनी केलेले कार्य खूप महत्त्वपूर्ण आहे . बाबासाहेबांनी महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह पिण्याच्या पाण्यासाठी केलेला असून अस्पृश्यांना समाजात मानाचे स्थान मिळावे तसेच त्यांना आपला हक्क प्रस्थापित करता यावे याकरिता दिलेला सामाजिक लढा होता . महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह ही मानवी स्वातंत्र्याचा लढा देणारी " नागरी हक्कांची चळवळ " होती . बाबासाहेबांनी महाड सत्याग्रह करत असताना अस्पृश्यांना वर्षानुवर्षे रूढी बंधनात ठेवलेल्या मनुस्मृती ग्रंथाचे दहन केले व अस्पृश्यांना रुढी परंपरेतून मुक्त करण्याचे महत्त्वाचे काम डॉ . बाबासाहेब आंबेडकरांनी केले . महाड चवदार तळ्याच्या सत्याग्रहामुळे अस्पृश्या मध्ये एकता प्रस्थापित झाली.

**संदर्भसूची (Bilography) -**

१ - डॉ . वाघ संदेश , आंबेडकरी चळवळीचा इतिहास , संदेश पब्लिकेशन पूष्ठ क्र . ९१ , ९२

२ - खैरमोडे भवानराव चांगदेव , डॉ . भीमराव रामजी आंबेडकर खंड-३ , सुगावा प्रकाशन , पुणे-३० पूष्ठ क्र . १८६

३ - डॉ . यशवंत मनोहर , डॉ . बाबासाहेब आंबेडकर एक शक्तीवेध , संघमित्रा प्रकाशन , पूष्ठ क्र .८३

४ - प्रा . कांबळे झुंबरलाल , बिवळकर राम , महाडचा मुक्तिसंग्राम , बार्टी प्रकाशित , पुणे , पूष्ठ क्र . ६५ , ६६

५ - जाधव राजा , सरकारी क्रांति मार्च चवदार तळ्याचा सत्याग्रह , मनोविकास प्रकाशन .